उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, कणकवली
मुंबई-गोवा मार्ग, कणकवली, ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग, पिनकोड – 416602

दुरध्वनी क्रमांक – 02367-232092 ईमेल- kankavlisdo1@gmail.com

जाहिरात क्र.एमएजी/पो पा भरती 01/2023 दि. 31/10/2023

संदर्भ - 1. महाराष्ट्र ग्रामपोलीस अधिनियम, 1967
2. महाराष्ट्र ग्राम पोलीस आदेश (सेवा, प्रवेश, पगार आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश, 1968
3. महाराष्ट्र शासन गृह विभाग शासन निर्णय क्र. बीव्हीपी 0299/सीआर-56/पोल-8, दि. 07.09.1999
4. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.बीव्हीपी 1107/प्र.क्र.515/पोल-8 दि. 16.10.2008
5. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.बीव्हीपी 1113/1767/प्र.क्र.592/पोल-8 दि. 22.08.2014
6. महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.बीव्हीपी 0613/प्र.क्र.312/पोल-8 दि. 27.08.2014
7. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.बीसीसी-2021/प्र.क्र.387/16-ब(ए) दि. 06.07.2021
8. मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांजकडील पत्र क्र.गृह/डेस्क-3/पोलीस पाटील/पदभरती/2023 दि. 17.07.2023

## पोलीस पाटील पदभरती जाहिरनामा 2023
## उपविभाग कणकवली ता. कणकवली जि. सिंधुदुर्ग

सिंधुदुर्ग जिल्हयातील कणकवली उपविभागाचे उपविभागीय दंडाधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील (ता. - कणकवली, वैभववाडी व देवगड) या तालुक्यातील रिक्त पोलीस पाटील पदे असलेल्या गावात पोलीस पाटील पदभरतीसाठी अर्हताधारक उमेदवारांकडून विहीत नमुन्यात ऑफलाईन पध्दतीने **दि. 01.11.2023 ते 09.11.2023** या कालावधीत सकाळी 10 ते सायंकाळी 6.15 या वेळेत अर्ज मागविण्यात येत आहे. सदर कालावधीनंतर प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर पोलीस पाटील भरतीसाठीचे विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित गावचे तहसिलदार कार्यालयात विक्रीसाठी उपलब्ध असुन उमेदवारांना रु 25 एवढे अर्ज शुल्क भरणा करुन अर्ज प्राप्त करुन घेता येतील. सदर अर्ज संबंधित गावचे तहलिसदार कार्यालयामध्येच वरील नमुद कालावधीत व वेळेतच अर्जासोबत लागु असणारी कागदपत्रे जोडुन उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहुनच सादर करावयाचे आहेत. पोस्टाने/इमेलव्दारे अथवा अन्य कोणत्याही माध्यमाव्दारे प्राप्त झालेल्या अर्जांचा भरती प्रक्रियेत विचार केला जाणार नाही. त्याचप्रमाणे तहसिलदार कार्यालयामार्फत वितरीत केलेले मुळ अर्जच स्विकारले जातील. अर्जाची झेरॉक्स स्विकारली जाणार नाही.

**अर्ज विक्री व स्विकारण्याचे ठिकाण - तहसिलदार कार्यालय कणकवली / वैभववाडी / देवगड**
**अर्ज विक्री व स्विकारण्याचा कालावधी - दि. 01.11.2023 ते 09.11.2023 कालावधीत सकाळी 10 ते सायंकाळी 6.15 या वेळेत**

**अर्ज व परिक्षा शुल्क -**

पोलीस पाटील भरती करीता अर्ज शुल्क व परिक्षा शुल्क खालीलप्रमाणे राहील. तसेच अर्जावर रु 5/- चा कोर्ट फी स्टॅम्प चिकटविणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| 1.अर्ज शुल्क - रु 25/- | अर्ज व परीक्षा शुल्क रोखीने केवळ ऑफलाईन पध्दतीने भरणा करणे आवश्यक आहे. धनादेश/डीमांड ड्राफ्ट स्विकारले जाणार नाहीत. तसेच सदर शुल्क हे नापरतावा आहे. |
| 2.परीक्षा शुल्क<br>खुल्या प्रवर्गाकरीता - रु 400/- व मागास प्रवर्गाकरीता - रु 300/- | |

**कणकवली उपविभागातील तालुकानिहाय पोलीस पाटील या पदाची भरावयाची एकुण पदे व त्यांचे आरक्षण खालील प्रमाणे आहे.**

| अ.क्र. | तालुका व तहसिलदार कार्यालयाचे नाव | भरावयाचे पोलीस पाटील पदांची संख्या |
|---|---|---|
| 1 | तहसिलदार कार्यालय कणकवली ता. कणकवली | 52 |
| 2 | तहसिलदार कार्यालय वैभववाडी ता. वैभववाडी | 37 |
| 3 | तहसिलदार कार्यालय देवगड ता. देवगड | 45 |
| एकुण | | **134** |

31-10-23

| अ.क्र. | तालुका | गावाचे नाव | पोलीस स्टेशन | प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| 1 | कणकवली | नेहरूनगर | कणकवली | अनुसूचित जाती |
| 2 | कणकवली | दाबगांव | कणकवली | अनुसूचित जाती |
| 3 | कणकवली | सांगवे | कणकवली | अनुसूचित जाती |
| 4 | कणकवली | तिवरे | कणकवली | अनुसूचित जाती |
| 5 | वैभववाडी | टेंबवाडी | वैभववाडी | अनुसूचित जाती |
| 6 | देवगड | गढीताम्हाणे | देवगड | अनुसूचित जाती महिला |
| 7 | वैभववाडी | मांडवकरवाडी | वैभववाडी | अनुसूचित जाती |
| 8 | वैभववाडी | कोळपे | वैभववाडी | अनुसूचित जाती |
| 9 | कणकवली | नवीन कुर्ली | कणकवली | अनुसूचित जाती महिला |
| 10 | कणकवली | साकेडी | कणकवली | अनुसूचित जाती |
| 11 | देवगड | पुरळ | विजयदुर्ग | अनुसूचित जाती |
| 12 | कणकवली | कळसुली | कणकवली | अनुसूचित जाती महिला |
| 13 | वैभववाडी | एडगाव | वैभववाडी | अनुसूचित जाती |
| 14 | वैभववाडी | जांभवडे | वैभववाडी | अनुसूचित जाती |
| 15 | वैभववाडी | सडूरे | वैभववाडी | अनुसूचित जाती महिला |
| 16 | कणकवली | नरडवे | कणकवली | अनुसूचित जाती |
| 17 | देवगड | कुवळे | देवगड | अनुसूचित जाती महिला |
| 18 | देवगड | ठाकूरवाडी | विजयदुर्ग | अनुसूचित जमाती महिला |
| 19 | कणकवली | हळवल | कणकवली | अनुसूचित जमाती |
| 20 | कणकवली | तळेरे | कणकवली | अनुसूचित जमाती |
| 21 | देवगड | तोरसोळे | देवगड | अनुसूचित जमाती |
| 22 | कणकवली | आयनल | कणकवली | अनुसूचित जमाती |
| 23 | देवगड | धोपटेवाडी | देवगड | अनुसूचित जमाती |
| 24 | कणकवली | शिवाजीनगर | कणकवली | अनुसूचित जमाती महिला |
| 25 | कणकवली | शिरवल | कणकवली | अनुसूचित जमाती |
| 26 | देवगड | हुर्शी | विजयदुर्ग | अनुसूचित जमाती |
| 27 | कणकवली | शिवडाव | कणकवली | अनुसूचित जमाती |
| 28 | देवगड | गिर्ये-रामेश्वर | विजयदुर्ग | अनुसूचित जमाती महिला |
| 29 | देवगड | तळेबाजार | देवगड | अनुसूचित जमाती महिला |
| 30 | देवगड | टेंबवली | देवगड | अनुसूचित जमाती |
| 31 | कणकवली | नडगिवे | कणकवली | अनुसूचित जमाती |
| 32 | देवगड | सांडवे | देवगड | अनुसूचित जमाती |
| 33 | देवगड | मोहूळगांव | देवगड | अनुसूचित जमाती महिला |
| 34 | देवगड | जुवेश्वर | विजयदुर्ग | अनुसूचित जमाती |
| 35 | देवगड | गिर्ये-अनपूर | विजयदुर्ग | अनुसूचित जमाती |
| 36 | देवगड | वाघोटण | विजयदुर्ग | विमुक्त जाती अ |
| 37 | वैभववाडी | नारकरवाडी | वैभववाडी | विमुक्त जाती अ |
| 38 | देवगड | खुडी | देवगड | विमुक्त जाती अ महिला |
| 39 | वैभववाडी | कुसूर | वैभववाडी | भटक्या जमाती (ब) |
| 40 | कणकवली | उपनगर | कणकवली | भटक्या जमाती (ब) |
| 41 | देवगड | आडबंदर | देवगड | भटक्या जमाती (ब) |
| 42 | कणकवली | कुरंगवणे | कणकवली | भटक्या जमाती (ब) महिला |
| 43 | कणकवली | आनंदनगर | कणकवली | भटक्या जमाती (ब) |
| 44 | कणकवली | संभाजीनगर( खारेपाटणनजीक) | कणकवली | भटक्या जमाती (ब) |
| 45 | वैभववाडी | बांधवाडी | वैभववाडी | भटक्या जमाती (ब) महिला |
| 46 | देवगड | फणसगांव | विजयदुर्ग | भटक्या जमाती (ब) |
| 47 | वैभववाडी | वायंबोशी | वैभववाडी | भटक्या जमाती (क) |

②
31-10-23

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 48 | वैभववाडी | नावळे | वैभववाडी | भटक्या जमाती (क) |
| **49** | देवगड | गोवळ | विजयदुर्ग | **भटक्या जमाती (क)** |
| 50 | वैभववाडी | शिराळे अरुळे | वैभववाडी | भटक्या जमाती (क) |
| 51 | **वैभववाडी** | **मोहितेवाडी** | **वैभववाडी** | **भटक्या जमाती (क) महिला** |
| 52 | **कणकवली** | **उत्तमनगर** | **कणकवली** | **भटक्या जमाती (क) महिला** |
| 53 | वैभववाडी | अरुळे | वैभववाडी | भटक्या जमाती (क) |
| 54 | कणकवली | तरंदळे | कणकवली | भटक्या जमाती (क) |
| 55 | **कणकवली** | **नागसावंतवाडी** | **कणकवली** | **भटक्या जमाती (क) महिला** |
| 56 | देवगड | रहाटेश्वर | देवगड | भटक्या जमाती (ड) महिला |
| 57 | **कणकवली** | **औदुंबरनगर** | **कणकवली** | **भटक्या जमाती (ड) महिला** |
| 58 | वैभववाडी | उपळे | वैभववाडी | भटक्या जमाती (ड) |
| **59** | देवगड | मुटाट | विजयदुर्ग | **भटक्या जमाती (ड)** |
| 60 | कणकवली | वारगाव | कणकवली | भटक्या जमाती (ड) |
| **61** | देवगड | मोर्वे | देवगड | विशेष मागास प्रवर्ग |
| 62 | देवगड | **कातवणेश्वर** | देवगड | विशेष मागास प्रवर्ग महिला |
| **63** | देवगड | विरवाडी | देवगड | विशेष मागास प्रवर्ग |
| **64** | देवगड | **कळंबई** | देवगड | **इतर मागास प्रवर्ग** |
| **65** | देवगड | चिंचवाड | विजयदुर्ग | इतर मागास प्रवर्ग |
| 66 | देवगड | **पडवणे** | देवगड | इतर मागास प्रवर्ग महिला |
| **67** | देवगड | वाडातर | देवगड | इतर मागास प्रवर्ग |
| 68 | देवगड | वाडाकेरपाई | देवगड | **इतर मागास प्रवर्ग महिला** |
| 69 | **वैभववाडी** | **खांबलवाडी** | **वैभववाडी** | **इतर मागास प्रवर्ग महिला** |
| **70** | देवगड | **बागमळा** | देवगड | **इतर मागास प्रवर्ग** |
| 71 | वैभववाडी | नाधवडे | वैभववाडी | इतर मागास प्रवर्ग |
| 72 | देवगड | **कसबा वाघोटण** | विजयदुर्ग | इतर मागास प्रवर्ग महिला |
| 73 | वैभववाडी | तिथवली | वैभववाडी | इतर मागास प्रवर्ग |
| 74 | देवगड | **नाद** | देवगड | इतर मागास प्रवर्ग महिला |
| **75** | देवगड | **तांबळडेग** | देवगड | **इतर मागास प्रवर्ग** |
| 76 | **वैभववाडी** | **कुंभारवाडी** | **वैभववाडी** | **इतर मागास प्रवर्ग महिला** |
| 77 | कणकवली | लिंगेश्वर | कणकवली | इतर मागास प्रवर्ग |
| 78 | कणकवली | कासार्डे | कणकवली | इतर मागास प्रवर्ग |
| 79 | देवगड | **मळेगांव** | देवगड | इतर मागास प्रवर्ग महिला |
| 80 | कणकवली | नांदगाव | कणकवली | इतर मागास प्रवर्ग |
| **81** | देवगड | विठ्ठलादेवी | विजयदुर्ग | **इतर मागास प्रवर्ग** |
| 82 | कणकवली | शिवाजीपेठ | कणकवली | इतर मागास प्रवर्ग |
| **83** | देवगड | तिर्लोट | विजयदुर्ग | **इतर मागास प्रवर्ग** |
| 84 | वैभववाडी | नेर्ले | वैभववाडी | इतर मागास प्रवर्ग |
| 85 | वैभववाडी | दिगशी | वैभववाडी | इतर मागास प्रवर्ग |
| 86 | **कणकवली** | **जांभळनगर (कासार्डे)** | **कणकवली** | **इतर मागास प्रवर्ग महिला** |
| **87** | देवगड | **लिंगडाळ** | देवगड | **इतर मागास प्रवर्ग** |
| 88 | कणकवली | वायंगणी | कणकवली | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| 89 | कणकवली | रामेश्वरनगर | कणकवली | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| 90 | वैभववाडी | मेहबूबनगर | वैभववाडी | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| **91** | देवगड | कातवण | देवगड | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| 92 | **कणकवली** | **पिंपळेश्वरनगर** | **कणकवली** | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक महिला** |
| 93 | **कणकवली** | **सुभाषनगर** | **कणकवली** | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक महिला** |
| 94 | कणकवली | घोणसरी | कणकवली | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| 95 | वैभववाडी | पिंपळवाडी | वैभववाडी | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |

31-10-23 ③

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 96 | देवगड | निमतवाडी | देवगड | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| 97 | **वैभववाडी** | **घाणेगडवाडी** | **वैभववाडी** | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक महिला** |
| 98 | देवगड | कालवी | देवगड | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| 99 | **कणकवली** | **श्रीनगर** | **कणकवली** | **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक महिला** |
| 100 | कणकवली | कुंभवडे | कणकवली | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| 101 | वैभववाडी | आखवणे भोम नागपवाडी पुनर्वसन गावठाण | वैभववाडी | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक |
| 102 | देवगड | मोंडपार | देवगड | सर्वसाधारण महिला |
| 103 | देवगड | फणसे | विजयदुर्ग | सर्वसाधारण |
| 104 | देवगड | पाळेकरवाडी | विजयदुर्ग | सर्वसाधारण महिला |
| 105 | देवगड | पावणाई | विजयदुर्ग | सर्वसाधारण |
| 106 | देवगड | पाटथर | देवगड | सर्वसाधारण |
| 107 | **कणकवली** | **आवळेश्वर** | **कणकवली** | **सर्वसाधारण महिला** |
| 108 | कणकवली | उल्हासनगर | कणकवली | सर्वसाधारण |
| 109 | कणकवली | काजिर्डे | कणकवली | सर्वसाधारण |
| 110 | कणकवली | गांगेश्वर | कणकवली | सर्वसाधारण |
| 111 | **कणकवली** | **गांधीनगर** | **कणकवली** | **सर्वसाधारण महिला** |
| 112 | **कणकवली** | **जांभळगांव** | **कणकवली** | **सर्वसाधारण महिला** |
| 113 | कणकवली | धारेश्वर | कणकवली | सर्वसाधारण |
| 114 | कणकवली | वरवडे | कणकवली | सर्वसाधारण |
| 115 | **कणकवली** | **बंदरगांव** | **कणकवली** | **सर्वसाधारण महिला** |
| 116 | कणकवली | ब्रम्हनगरी | कणकवली | सर्वसाधारण |
| 117 | कणकवली | भैरवगांव | कणकवली | सर्वसाधारण |
| 118 | कणकवली | येवतेश्वरगांव | कणकवली | सर्वसाधारण |
| 119 | कणकवली | राजनगर | कणकवली | सर्वसाधारण |
| 120 | कणकवली | रांजणगाव | कणकवली | सर्वसाधारण |
| 121 | कणकवली | शास्त्रीनगर | कणकवली | सर्वसाधारण |
| 122 | कणकवली | हुंबरणे | कणकवली | सर्वसाधारण |
| 123 | वैभववाडी | सांगुळवाडी | वैभववाडी | सर्वसाधारण |
| 124 | **वैभववाडी** | **खांबाळे** | **वैभववाडी** | **सर्वसाधारण महिला** |
| 125 | वैभववाडी | भोम | वैभववाडी | सर्वसाधारण |
| 126 | **वैभववाडी** | **हेत** | **वैभववाडी** | **सर्वसाधारण महिला** |
| 127 | वैभववाडी | मांगवली | वैभववाडी | सर्वसाधारण |
| 128 | वैभववाडी | मौदे | वैभववाडी | सर्वसाधारण |
| 129 | वैभववाडी | रिंगेवाडी | वैभववाडी | सर्वसाधारण |
| 130 | **वैभववाडी** | **भुसारवाडी** | **वैभववाडी** | **सर्वसाधारण महिला** |
| 131 | **वैभववाडी** | **कुंभारी** | **वैभववाडी** | **सर्वसाधारण महिला** |
| 132 | वैभववाडी | करुळ | वैभववाडी | सर्वसाधारण |
| 133 | वैभववाडी | भट्टीवाडी | वैभववाडी | सर्वसाधारण |
| 134 | वैभववाडी | जामदारवाडी | वैभववाडी | सर्वसाधारण |

31-10-23 ④

**पोलीस पाटील पदासाठी किमान आवश्यक अर्हता व अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -**

1) अर्जदार हा किमान दहावी (एस.एस.सी.) उत्तीर्ण असावा. **अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेच्या पुराव्याची सत्यप्रत जोडावी.** उदा. किमान 10 वी पास किंवा त्यावरील परीक्षा पास गुणपत्रक/प्रमाणपत्र प्रत

2) (अ) वयोमर्यादे करीता अर्जदाराचे अर्हता **दि. 31.12.2023** रोजीचे वय विचारात घेतले जाईल. **पुराव्यादाखल जन्म प्रमाणपत्र अथवा शाळा सोडल्याचा दाखला यापैकी एक पुरावा जोडणे आवश्यक आहे.** याव्यतिरीक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही. सदर पुरावा स्वसाक्षांकित असावा तसेच स्वयंघोषणापत्र संलग्न करावे.
(ब) अर्जदाराचे वय **दि. 31.12.2023** रोजी 25 पेक्षा कमी नसावे व 45 पेक्षा जास्त नसावे.
(क) पोलीस पाटील पदाकरीता वयोमर्यादा शिथीलक्षम नाही.

3) अर्जदार हा त्या महसुली गावचा स्थानिक व कायम रहिवासी असावा. महसुली **गावचा रहीवासी असलेबाबत संबंधित तहसिलदार यांचेकडील वास्तव्याचा/रहीवाशी दाखला अथवा ज्या पुराव्याने उमेदवाराचे संबंधित महसुली गावातील स्थानिक व कायम रहीवासी असल्याचे सिध्द होते असे आधारकार्ड, निवडणुक ओळखपत्र, ड्रायव्हींग लायसन्स यापैकी एका पुराव्याची साक्षांकित प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.**

4) अर्जासोबत उमेदवाराचा **अलिकडचे काळातील काढणेत आलेले पासपोर्ट आकाराचे दोन रंगीत फोटो पैकी एक फोटो अर्जावर योग्य ठिकाणी चिकटवुन त्यावर उमेदवाराने स्वाक्षरी करावी.**

5) अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असावा व अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असणे आवश्यक आहे.

6) महाराष्ट्र राज्य सेवा (लहान कुटूंबातील प्रतिज्ञापत्र) नियम 2005 मधील लहान कुटूंबाची अर्हता धारण करणे आवश्यक आहे. (अर्जदार यास अर्हता/जाहीरनाम्याच्या दिनांकास दोन पेक्षा जास्त अपत्य नसावेत.) **लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे.**

7) अनु. जाती, अनु. जमाती, विजा-अ, भज ब, क, ड, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, प्रवर्गाच्या आरक्षित पदाकरीता त्या प्रवर्गाचे **सक्षम अधिकारी यांनी निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.**

8) **आर्थिकदृष्टया दुर्बल घटक या प्रवर्गाकरीता अर्ज करणा-या उमेदवाराने अर्जासोबत सन 2023-24 या कालावधीकरीता वैध असलेले व आर्थिकदृष्टया दुर्बल घटक या प्रवर्गात मोडत असलेबाबतचे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.**

9) विजा-अ व भज ब, क, ड, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, या प्रवर्गातील अर्जदार यांना **सन 2023-24 या आर्थिक वर्षातील वैध असलेले उन्नत आणि प्रगत गटात (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक राहील.**

10) **महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. महिआ 2023/प्र.क्र.223/कार्या- 2 दि.4 मे 2023 अन्वये खुल्या गटातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदाच्या निवडीकरिता नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची अट रद्द करणेत आलेली आहे. तसेच, अनुसूचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरिता आरक्षित असलेल्या पदाच्या निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडून वेळोवेळी विहित करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.**

11) **विवाहीत महिला उमेदवार असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/नाव बदलाबाबतचे गॅझेट प्रत, पॅनकार्डची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

12) **लागु असल्यास दहावी/एसएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव उमेदवाराचे नावात कोणताही बदल झाला असल्यास त्याबाबत शासन राजपत्राची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

13) **परिक्षा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

14) **मयत/सेवानिवृत्त पोलीस पाटीलांचे वारस असल्यास त्याबाबतचे कायदेशीर वारस असलेबाबतचे अधिकृत कागदपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

15) **माजी सैनिक उमेदवारांकरीता जिल्हा सैनिक बोर्डामध्ये नाव नोंदविलेबाबतचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

**परीक्षेचे स्वरुप-**

| अ.क्र. | पदनाम संवर्ग | परीक्षेचे गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | लेखी परीक्षा | तोंडी परीक्षा गुण | एकूण गुण |
| 1 | पोलीस पाटील | 80 | 20 | 100 |

s/[illegible] 31-10-23 (5)

**लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप साधारणपणे खालील प्रमाणे राहील:-**

1) पोलीस पाटील पदाची लेखी परीक्षा 80 गुणांची असेल व प्रत्येक प्रश्न एक गुणाचा राहील.
2) लेखी परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ व बहुपर्यायी स्वरुपाची असेल.
3) लेखी परीक्षा इयत्ता दहावी (एस. एस. सी.) पर्यंतच्या अभ्यासक्रमावर आधारीत असेल. यात सामान्य ज्ञान, गणित, पोलीस पाटलांचे अधिकार व कर्तव्य, बुध्दीमत्ता चाचणी, स्थानिक परिसराची माहिती, चालू घडामोडी, सिंधुदुर्ग जिल्हा माहिती इत्यादी विषयाचा समावेश असेल.
4) पोलीस पाटील भरती/निवडीसाठी घेण्यात येणा-या 80 गुणांच्या लेखी परीक्षेत किमान 36 गुण (45%) प्राप्त करणारे उमेदवार तोंडी परीक्षेस पात्र ठरतील.
5) लेखी परिक्षेचा कालावधी दोन तास तसेच परिक्षेचे माध्यम मराठी राहील. लेखी परीक्षा सुरु होण्यापुर्वी उमेदवारांनी परिक्षा केंद्रावर 1 तास अगोदर उपस्थित राहणे आवश्यक आहे.
6) पोलीस पाटील पदाचे लेखी परीक्षेचा दिनांक, वेळ, परिक्षा प्रवेशपत्र वितरण, परिक्षेचे ठिकाण व परीक्षेबाबत इतर सुचना उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय कणकवली तसेच संबंधित तहसिलदार कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावण्यात येतील. नोटीस बोर्डावरील सदर माहितीबाबत अदययावत राहण्याची जबाबदारी संबंधित उमेदवारांची राहील.
7) लेखी परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी, परिक्षा प्रवेशपत्र प्राप्त करुन घेण्याचा कालावधी संबंधित तहसिल कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल. सदर कालावधीत परीक्षा प्रवेशपत्र संबंधित तहसिलदार कार्यालयातुन प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी पुर्णत: उमेदवाराची राहील.
8) परिक्षेस येताना परिक्षा कक्षामध्ये सोबत परिक्षा प्रवेशपत्र व स्वत:चे फोटो ओळखपत्र (आधार, पॅन, ड्रायव्हिंग लायसन्स, निवडणुक ओळखपत्र यापैकी एक) ठेवणे बंधनकारक आहे.
9) कोणत्याही कारणास्तव परिक्षा स्थगित ठेवावी लागल्यास पुढील परिक्षेची वेळ, ठिकाण व दिनांक उमेदवारास त्याने अर्जात नमुद केलेल्या मोबाईल क्र./ ई मेलव्दारे कळविणेत येईल. तशा सुचना संबंधित तहसिलदार कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येतील. अशा वेळी प्रथम परिक्षेचे प्रवेशपत्र ग्राहय धरण्यात येईल.
10) परिक्षेला परिक्षा कक्षामध्ये कोणतेही पुस्तकी साहीत्य, कॅलक्युलेटर, मोबाईल, स्मार्ट वॉच, इअर फोन इ. इलेक्ट्रॉनिक गॅझेट सोबत बाळगता येणार नाही. असे साहीत्य आढळुन आल्यास संबंधित उमेदवारास तात्काळ भरती प्रक्रियेपासुन अपात्र ठरविणेत येईल.
11) **शासन निर्णय क्र. डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र.592/ पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये लेखी परीक्षेतुन मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारास पोलीस पाटील भरती /निवडीसाठी घेण्यात येणा-या 20 गुणांच्या तोंडी (मुलाखत) परीक्षेस उपस्थित राहणे अनिवार्य राहील. तोंडी परीक्षेत अनुपस्थित राहणारा उमेदवार अंतिम निवडीस अपात्र ठरेल.**
12) लेखी परीक्षा व तोंडी परीक्षा यामध्ये एकत्रित जास्त गुण प्राप्त करणारा उमेदवार अंतिम निवडीस पात्र ठरेल.
13) भरतीप्रक्रियेमधील तोंडी, लेखी परिक्षेस, कागदपत्राचे तपासणीकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**OMR शीट (उत्तरपत्रिके) बाबत सुचना**

1. पोलीस पाटील पदाची लेखी परीक्षेची उत्तरे नोंदविणेकरीता ओएमआर शीट उत्तरपत्रिकांचा वापर होणार असलेने उत्तरपत्रिका काळजीपुर्वक हाताळावी, ती चुरगळणार नाही, फाटणार नाही, खराब होणार नाही, त्यावर कोणतीही खाडाखोड होणार नाही याची उमेदवाराने दक्षता घ्यावी.
2. लेखी परीक्षा घेतेवेळी उत्तरपत्रिकेची OMR शीट प्रमाणे तपासणी होणार असल्याने उत्तरे लिहीण्यासाठी अथवा योग्य पर्यायावर भरीव वर्तुळाने चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळया शाईचे बॉल पेन वापरावे.
3. उत्तरपत्रिकेच्या OMR शीटवर विहीत ठिकाणी परिक्षेचे नाव, प्रश्नपत्रिका संच क्रमांक, बैठक क्रमांक, प्रश्नपत्रिका क्रमांक योग्य ठिकाणी व अचुकपणे नमुद करुन विहीत ठिकाणी स्वाक्षरी करावी.

**निवड कार्यपध्दती, अटी व शर्ती :-**

1) लेखी परिक्षेत प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवडीसाठी अर्जदारांस पात्रता व इतर संबंधीत मूळ प्रमाणपत्र तोंडी परीक्षेपूर्वी तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी लागतील अन्यथा तोंडी परीक्षेकरीता त्याचा विचार केला जाणार नाही.
2) लेखी परीक्षा, तोंडी परीक्षा, कागदपत्रे छाननी, इ. करिता तसेच प्रवेशपत्र, भरती कार्यक्रम याबाबतच्या विविध सूचना या केवळ उपविभागीय अधिकारी कार्यालय कणकवली व संबंधित तहसिलदार कार्यालयांचे नोटीस बोर्डावर लावण्यात येतील. सबब सदर नोटीस बोर्डावरील सुचना पाहणे, भरती प्रक्रियेची माहिती / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील.
3) लेखी परीक्षेअंती मुलाखतीसाठी पात्र अर्जदारांची आवश्यक पात्रता व अर्जात भरलेली माहिती याची पडताळणी मूळ कागदपत्रावरुन करण्याकरीता अंतरीम यादी जाहीर करण्यात येईल. ज्या अर्जदारांची जाहिरातीतील आवश्यक पात्रता व

31-10-23

अर्जात भरलेली माहिती, परीक्षा शुल्क आणि कागदपत्रांच्या आधारे परिपूर्ण सिध्द होईल त्या अर्जदाराचा विचार भरती प्रक्रियेच्या पुढील टप्याकरीता करण्यात येईल. जाहिरातीत नमूद केलेली संपूर्ण अर्हता, अर्जात भरलेली माहिती व तपासणीच्या वेळी सादर केलेली मूळ कागदपत्रे यामध्ये तफावत आढळल्यास अर्जदाराची उमेदवारी भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द होऊ शकेल. तसेच अशा अर्जदाराचे परीक्षा शुल्क व इतर सवलती नामंजूर करण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

4) **अर्जदार शारिरीकदृष्टया सक्षम असल्याबाबतचे जिल्हा शल्य चिकीत्सक यांचेकडील मूळ प्रमाणपत्र नियुक्तीनंतर सहा महिन्याचे आत सादर करणे उमेदवारांना बंधनकारक राहील. सदर प्रमाणपत्र मुदतीत सादर न केल्यास नियुक्ती रद्द करणेत येईल.**

5) **अर्जदार व्यक्तीस कोणत्याही गुन्हयात कोणत्याही प्रकारचा दंड अगर शिक्षा झालेली नसावी. त्याबाबतचे स्वयंघोषणापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. अर्जदाराचे चारित्र्य निष्कलंक असल्याबाबतचे संबंधीत पोलीस स्टेशनचे चारित्र्य प्रमाणपत्र हे लेखी परिक्षेत उत्तीर्ण होवुन तोंडी परिक्षेपुर्वी कागदपत्रांचे तपासणीदरम्यान सादर करणे बंधनकारक आहे. सदर प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा उमेदवारांचा तोंडी परिक्षेकरीता विचार केला जाणार नाही.**

6) अर्जदाराचा कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंध नसावा. त्याचप्रमाणे तो ग्रामपंचायत सदस्य नसावा. तसेच खाजगी किंवा निमसरकारी संस्थेचा सदस्य नसावा, अथवा पूर्णवेळ नोकरी करणारा नसावा. तसेच अर्जासोबत कोणतीही राजकीय शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा असे अर्ज निवडप्रक्रियेतुन अपात्र ठरविणेत येतील.

7) **पोलीस पाटील पदावर नियुक्त होणा-या मागास वर्गातील उमेदवारास नियुक्ती दिनांकापासुन 6 महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील विहीत कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता, कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द/समाप्त करणेत येईल.**

8) अपुर्ण माहितीचे, विहीत नमुन्यात व कालावधीत प्राप्त न झालेले, विहीत शुल्क भरणा न केलेले, शैक्षणिक अर्हता धारण न केलेले, वयाची अट पुर्तता न केलेले, फोटो नसलेले, मुदतबाहय अर्ज रद्द करणेत येतील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

9) पोलीस पाटील पदावरील नियुक्तीकरीता मृत / सेवानिवृत्त पोलीस पाटलांच्या वारसांनी अर्ज केल्यास त्याला **शासन निर्णय क्र. डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र.592/ पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये** प्राधान्य देण्यात येईल. परंतु याचा अर्थ एकाच स्थानासाठी (Position) पोलीस पाटलांच्या वारसांसह दोन किंवा अधिक अर्जदारांना समान गुण मिळाल्यास पोलीस पाटलांच्या वारसांची निवड करण्यात प्राधान्य देण्यात येईल. परंतु तो महाराष्ट्र ग्राम पोलीस पाटील (सेवा प्रवेश, पगार भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती) आदेश 1968 व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात आलेल्या सुधारणानुसार त्या गावांसाठी ठरविण्यात आलेल्या सामाजिक/समांतर आरक्षणाचा असला पाहिजे.

10) अर्जदार संबंधीत महसुली गावाचा स्थानिक व कायमचा रहिवासी असणे आवश्यक आहे.

11) अर्जदार कोणत्याही एकाच गावाचा स्थानिक / कायमचा रहिवासी असू शकतो. सबब अर्जदाराने अशाच एका गावात अर्ज करावा. एकापेक्षा अधिक गावातून केलेले सर्व अर्ज बाद करण्यात येतील.

12) प्रत्येक गावात केवळ एक पद उपलब्ध आहे व ते शासकीय निकषानुसार आरक्षित करण्यात आलेले आहे. अर्ज करतांना अर्जदाराने आरक्षण तपासून अर्ज करावा. (आरक्षण व्यतिरीक्त उमेदवारांनी अर्ज करु नये.)

13) कणकवली उपविभागातील रिक्त पदांच्या सर्व गावांसाठी एकाच दिवशी व एकाच वेळी परीक्षा घेण्यात येईल.

14) संपूर्ण भरती प्रक्रिया महसुली गाव निहाय होणार असून कोणत्याही दोन महसुली गावाच्या प्रक्रियेचा एकमेकांशी संबंध नसेल.

15) पोलीस पाटील हे पद वर्गीकृत नाही.

16) पोलीस पाटलांना क्षेत्रिय स्तरावर (Field work) काम करावे लागते. त्यामुळे सदर पदधारण करणारी व्यक्ती ही शारिरीक दृष्टया सक्षम असणे आवश्यक आहे. त्यामुळे त्यांना अपंगासाठीचे आरक्षण लागू करण्यात आलेले नाही.

17) पोलीस पाटील हे पद एका गावात एकच असते, त्यामुळे हे पद एकाकी असल्याने त्यांना प्रकल्पग्रस्त, माजी सैनिक, खेळाडू यासारखी समांतर आरक्षणे लागू होत नाहीत.

18) महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती (विमुक्त जाती भटक्या जमाती, विशेष मागासवर्ग व इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्र. 8) अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक 29 जानेवारी 2004 पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेयर) तत्व वि.जा. (अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड). विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी जात, उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे वैध असलेले (अद्ययावत नॉनक्रिमीलेयर) प्रमाणपत्र मूळ कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

19) सामान्य प्रशासन विभागाकडील शासन अधिसूचना क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000/12, दिनांक 28/03/2005 व क्र.एसआरव्ही-2000/प्र.क्र.17/2000 दिनांक 01/07/2005 तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम 2005 अन्वये दिनांक 28/03/2005 रोजी हयात असलेले व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान

31-10-23 (7)

कुटुंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहीत असणा-या उमेदवारांना विहीत (अ) नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

20) **शासन निर्णय क्र. डीव्हीपी-1113/1767/प्र.क्र.592/ पोल-8, दिनांक 22/08/2014 अन्वये गुणवत्ता यादीतील एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास प्राधान्य क्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड खालीलप्रमाणे केली जाईल.**
   1. **पोलीस पाटलांचे वारस, (पोलीस पाटलांच्या वारसामध्ये पती,पत्नी आणि दोन मुले यांचा समावेश त्या व्यतिरीक्त अन्य कोणत्याही नातेवाईकांचा वारस म्हणून विचार करता येणार नाही ) त्यानंतर**
   2. **अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास उच्च शैक्षणिक अर्हता धारण करणारे अर्जदार, त्यानंतर**
   3. **माजी सैनिक असलेले अर्जदार, त्यानंतर**
   4. **वयाने जेष्ठ असलेले अर्जदार**

21) याशिवाय महाराष्ट्र ग्राम पोलीस अधिनियम 1967 व त्यास संलग्न असलेले नियम आणि वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेले आदेश, शासन निर्णय व परिपत्रके तसेच नेमणुकीसाठी इतर प्रचलित असलेल्या अटी शर्ती यासुध्दा बंधनकारक असतील.

22) ज्या उमेदवारांनी हा जाहिरनामा / जाहिरात प्रसिध्द होण्यापूर्वी पोलीस पाटील पदांसाठी कोणत्याही प्रकारचे अर्ज केले असतील ते सर्व अर्ज रद्द झाले आहेत असे समजण्यात येईल.

**<u>अर्ज करण्याची पध्दत</u> -**

1) प्रस्तुत पदांकरीता फक्त संबंधित तहसिलदार कार्यालयामार्फत वितरीत करणेत आलेले विहीत नमुन्यातील, आवश्यक कागदपत्र अर्जासोबत जोडलेले परिपुर्ण मुळ अर्जच स्विकारण्यात येतील. सदर अर्ज उमेदवाराने संबंधित तहसिलदार कार्यालयात स्वत: उपस्थित राहुन सादर करावा. इतर कोणत्याही प्रकारे/माध्यमाव्दारे अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत. उमेदवारांनी अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक चुकीचा / अपूर्ण असल्यामुळे संपूर्ण भरती प्रक्रियेदरम्यान पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच ई-मेल आयडी व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना **उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय, कणकवली** हे जबाबदार असणार नाही.

2) उमेदवारांने अर्जासोबत, शैक्षणिक कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील याबाबत उमेदवारास तक्रार करता येणार नाही. अर्जात भरलेली माहिती बदलता येणार नाही. जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व गावनिहाय आरक्षण वगैरेची पात्रता तपासून अर्ज भरावा.

3) उमेदवारांनी अर्जात नमूद केलेली माहिती, अर्जासोबत सादर केलेली कागदपत्रे यावरुन कागदपत्रांची छाननी केली जाईल व लेखी परीक्षेस पात्र ठरणा-या उमेदवारांची यादी संबंधित तहसिलदार कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार अध्यक्ष, पोलीस पाटील भरती 2023 तथा **उपविभागीय दंडाधिकारी कणकवली** यांनी राखून ठेवले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

4) ज्या उमेदवारांनी यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र/ सेवायोजन कार्यालय/समाजकल्याण विभाग/आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय येथे नोंदविलेले असले तरी अशा उमेदवारांना विहित मुदतीत स्वतंत्ररित्या अर्ज करणे व परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील. अशा उमेदवारांनी अन्य कोणत्याही मार्गाने सादर केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

5) **माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर नोंदणीचे प्रमाणपत्र मूळ कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करावे लागेल.**

6) अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परीक्षेस/मूळ कागदपत्र पडताळणीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहीत अर्हता धारण न करणारा आढळल्यास किंवा खोटी माहिती पुरविल्यास किंवा एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

7) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची उमेदवारी/ नियुक्ती रद्द करण्यात येईल व शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

8) अपात्र अर्जदारास स्वतंत्ररीत्या कळविण्यात येणार नाही.

(8)

31-10-23

9) लेखी परीक्षा, मूळ कागदपत्रांची पडताळणी व मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

10) वरील अटी, शर्ती व नियमांव्यतिरीक्त शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेले आदेश व निर्णय या प्रक्रियेस लागू राहतील.

**सामाजिक आरक्षण -**

1. रिक्त पदांची संख्या, आरक्षण, अनुशेष यात बदल होण्याची शक्यता आहे. महिलांसाठी विहीत केलेले आरक्षण नियमानुसार अनुज्ञेय असेल.
2. महिलांसाठी 30% प्रमाणे आरक्षित पदे महिला व बालविकास विभाग यांचेकडील दि. 25.05.2001 च्या शासन निर्णयानुसार भरण्यात येतील. तथापी एखादया प्रवर्गात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधुन भरण्यात येतील.
3. वि.जा.(अ.), भ ज.(ब.), भ.ज.(क.) व भ.ज.(ड.) या प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असुन आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारे करणेत येईल.
4. **आरक्षणानुसार त्या प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध न झाल्यास शासन निर्णय क्र. बी.व्हीबीपी 1107/प्र.क्र.515/पोल-8 दि. 16 ऑक्टोबर 2008 नुसार खालीलप्रमाणे प्रवर्गाचे तीन गट करुन त्या गटातील प्रवर्गातील उमेदवारांमधुन अदलाबदलीने अर्ज मागविणेत येईल.**
    1. **अनुसुचित जाती व अनुसचित जमाती**
    2. **विमुक्त जाती अ व भटक्या जमाती ब**
    3. **भटक्या जमाती क, भटक्या जमाती ड व इतर मागास वर्गीय**

    **वरीलप्रमाणे गटातीलही उमेदवार प्राप्त न झाल्यास ते पद खुल्या प्रवर्गातुन भरणेत येईल. तसेच महिलांसाठी आरक्षित ठेवण्यात आलेल्या पदासाठी त्या प्रवर्गातील महिला उपलब्ध न झाल्यास ते पद त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधुन भरणेत येईल.**
5. **सदर जाहिरनाम्यात नमुद अर्ज स्वीकृती कालावधीत संबंधित महसुली गावात ठरवुन दिलेल्या आरक्षणानुसार एकही अर्ज प्राप्त न झाल्यास अथवा प्राप्त अर्जांमधुन लेखी परिक्षेकरीता उमेदवार पात्र न ठरल्यास संबंधित महसुली गावाकरीता वरीलप्रमाणे शासन निर्णयात प्रवर्गनिहाय ठरवुन दिलेप्रमाणे अदलाबदलीच्या आरक्षणाबाबतचा जाहिरनामा काढण्यात येईल व सदर जाहिरनामा उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय कणकवली, संबंधित तहसिलदार कार्यालये तसेच संबंधित महसुली गावचे ग्रामपंचायत, तलाठी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल.**
6. इतर राज्यातुन महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरीता विचार केला जाणार नाही.
7. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि. 12.02.2019 व दि. 31.05.2021 अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**सर्वसाधारण सुचना -**

1. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.
2. रिक्त पदांचे संख्येत वाढ अथवा घट होण्याची शक्यता आहे.
3. सदर जाहिरात व जाहिरातीमध्ये / वेळापत्रकामध्ये / निवडप्रक्रियेमध्ये काहीही बदल झाल्यास त्याबाबतची माहिती तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी व कणकवली यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल. तहसिलदार कार्यालयाचे नोटीस बोर्ड पाहुन भरती प्रक्रियेबाबत वेळोवळी अदययावत राहण्याची जबाबदारी ही संबंधित उमेदवारांची राहील. याबाबत उपविभागीय दंडाधिकारी कणकवली हे जबाबदार राहणार नाहीत.
4. भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर भरती प्रक्रिया स्थगीत/रद्द करणे, पुढे ढकलणे, भरतीप्रक्रियेच्या वेळापत्रकात बदल करणे इ. भरती प्रक्रीयेबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, पोलीस पाटील भरती प्रक्रिया 2023 समिती तथा उपविभागीय दंडाधिकारी कणकवली यांचेकडे राखुन ठेवणेत आलेले आहेत.

31-10-23 (9)

**पोलीस पाटील भरतीबाबत वेळापत्रक**

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | वार व दिनांक | ठिकाण |
|---|---|---|---|
| 1 | वर्तमानपत्र प्रथम जाहिरात / जाहिरनामा प्रसिध्द करणे | मंगळवार दि. 31.10.2023 | उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय कणकवली, तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली यांचे नोटीस बोर्डावर |
| 2 | प्रथम जाहिरात/जाहिरनाम्यानुसार अर्ज विक्री व स्विकारणे (स. 10.00 ते सायं. 6.15 या वेळेत) | बुधवार दि. 01.11.2023 ते गुरुवार दि. 09.11.2023 | तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली |
| 3 | प्रथम जाहिरात/जाहिरनाम्यानुसार अर्जाची छाननी करुन लेखी परिक्षेसाठी पात्र, अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | शुक्रवार दि. 17.11.2023 | तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली यांचे नोटीस बोर्डावर |
| 4 | परिक्षा प्रवेशपत्र प्राप्त करुन घेणे | मंगळवार दि. 12.12.2023 ते गुरुवार दि. 14.12.2023 | तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली |
| 5 | लेखी परिक्षा<br>परिक्षा ठिकाण प्रवेशपत्रावर नमुद करणेत येईल. | रविवार दि. 17.12.2023 | - |
| 6 | लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या व तोंडी परिक्षा / मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांची गावनिहाय यादी प्रसिध्द करणे | मंगळवार दि. 19.12.2023 | तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली यांचे नोटीस बोर्डावर |
| 7 | लेखी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या व तोंडी परिक्षा / मुलाखतीकरीता पात्र उमेदवारांचे अर्जासोबत सादर केलेल्या मुळ कागदपत्रांची तपासणी व तोंडी परिक्षा/मुलाखत | शुक्रवार दि. 22.12.2023 ते बुधवार दि. 27.12.2023 | |
| 8 | लेखी व तोंडी परिक्षेतील गुणांचे आधारे निवड झालेल्या उमेदवारांची गावनिहाय निवड यादी व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करणे | शुक्रवार दि. 29.12.2023 | तहसिलदार कार्यालय देवगड, वैभववाडी, कणकवली यांचे नोटीस बोर्डावर |
| 9 | नियुक्ती आदेश निर्गमित करणे | सोमवार दि. 01.01.2024 | उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय कणकवली |

S/- 31-10-23

**उपविभागीय दंडाधिकारी, कणकवली**
**तथा, अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती**
**प्रक्रिया समिती कणकवली - 2023**

प्रत - 1.मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग (उपचिटणीस शाखा) यांजकडे माहितीसाठी सविनय सादर

2.तहसिलदार कणकवली/वैभववाडी/देवगड यांना माहितीसाठी, नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी, रिक्त असलेल्या पोलीस पाटील पदाचे तलाठी सजा, ग्रामपंचायत कार्यालय यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्दीसाठी व संबंधित गावात पुरेशी प्रसिध्दी देणेसाठी, जाहिरनामा प्रसिध्द करुन अहवाल सादर करणेसाठी रवाना

S/- 31-10-23

**उपविभागीय दंडाधिकारी, कणकवली**
**तथा, अध्यक्ष पोलीस पाटील पदभरती**
**प्रक्रिया समिती कणकवली - 2023**

## उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय कणकवली ता. कणकवली जि. सिंधुदुर्ग

## पोलीस पाटील भरती 2023

## पोलीस पाटील पदासाठी अर्जाचा नमुना

**अर्ज क्र.**

| केवळ कार्यालयीन वापरासाठी | |
|---|---|
| अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक | |
| अर्ज प्राप्त दिनांक | |
| अर्ज केलेल्या जातीचा प्रवर्ग | |
| अर्ज केलेल्या महसुली गाव व तालुक्याचे नाव | |

उमेदवाराचा पासपोर्ट आकाराचा रंगीत स्वसाक्षांकित फोटो

प्रति

मा. उपवभिागीय अधिकारी
तथा उपविभागीय दंडाधिकारी कणकवली

विषय - पोलीस पाटील पदासाठी अर्ज
संदर्भ - जाहिरातीचा क्रमांक...........................................................दि.

उपरोक्त संदर्भिय प्रसिध्द जाहीरनाम्याप्रमाणे मी ............................... तालुक्यातील .................................या महसुली गावचे पोलीस पाटील पदासाठी अर्ज करत असुन जाहिरातीत नमुद केलेप्रमाणे आवश्यक असलेली वैयक्तिक माहिती खालीलप्रमाणे सादर करीत आहे.

1. तालुक्याचे नाव -...............................................
2. ज्या महसुली गावचे पोलीस पाटील पदासाठी अर्ज करीत आहे त्या महसुली गावाचे नाव -.........................................
3. उमेदवाराने ज्या महसुली गावचे पोलीस पाटील पदासाठी अर्ज केला आहे, त्याच गावचा उमेदवार हा रहीवासी आहे काय ? होय / नाही
4. आडनाव पहिले नाव वडीलांचे/पतीचे नाव

मराठी ...........................................................................................................................

इंग्रजी ...........................................................................................................................
(Capital Letters)

5. पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) मराठीत

.....................................................................................................................................

.....................................................................................................................................

6. दुरध्वनी क्रमांक - ..................................................
7. मोबाईल क्रमांक - ..................................................

31-10-23

8. इमेल आयडी - ..........................................................................................

9. लिंग पुरुष/स्त्री - .........................................................

10. अर्जदाराची जन्मतारीख - दिनांक ......................महिना..............................वर्ष....................

11. अर्हता/जाहिरनाम्याचा दिनांक 31/12/2023 रोजी पुर्ण होणारे वय ..........वर्ष ..........महिने..........दिवस

12. उमेदवार विवाहीत आहे काय ? होय / नाही ..................

13. अ) दि.01/11/2023 रोजी अपत्यांची एकुण संख्या ................

ब) पैकी दि. 28.03.2005 नंतर जन्मलेल्या अपत्यांची संख्या ....................

14. ज्या प्रवर्गातुन अर्ज सादर करीत आहे तो प्रवर्ग नमुद करणे आवश्यक आहे.
प्रवर्गाचे नाव ..........................................

(खालील चौकोनात / कंसात अशी खुण करावी) सोबत सक्षम प्राधिकारी यांचेकडुन घेतलेल्या जात प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे. तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचा नॉन क्रिमीलेअर दाखला अजा. व अज. वगळुन अन्य मागास संवर्गाचे उमेदवारांनी (त्या प्रवर्गातील महिलांसह ) सादर करणे आवश्यक आहे.

| अजा | अज | विजाअ | भजब | भजक | भजड | विमाप्र | इमाव | इडब्लुएस | खुला अराखीव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

15. महिलांचे आरक्षणातुन अर्ज सादर केला आहे / नाही - .............................

16. उमेदवारा पोलीस पाटीलांचे वारस आहे/नाही -.......................

17. उमेदवार माजी सैनिक आहे/ नाही -...................................

18. शैक्षणिक अर्हता (प्रमाणपत्राची सत्यप्रत जोडणे बंधनकारक आहे)

| अर्जदाराची शैक्षणिक व अन्य अर्हता (उत्तीर्ण झालेल्या परिक्षांचा तपशील) | बोर्ड / परिक्षा मंडळाचे / विदयापीठ नाव | उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | प्रमाणपत्राचा क्र., दिनांक व मिळालेल्या गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|
| अ)किमान शैक्षणिक अर्हता 10 वी एसएससी उत्तीर्ण प्रमाणपत्र | | | |
| ब)12 वी एचएससी उत्तीर्ण प्रमाणपत्र | | | |
| क)पदवी/पदविका उत्तीर्ण प्रमाणपत्र | | | |
| ड)पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र | | | |

31-10-23

19. परिक्षा शुल्क (मागासवर्गीयांसाठी रक्कम रु 300/- व इतरांसाठी रक्कम रु 400/- )

रक्कम **रु** ......................

परिक्षा शुल्क रोख भरणा केलेल्या पावतीचा क्रमांक...................................

**अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे**

| अ.क्र. | कागदपत्रे | सोबत जोडले आहे/नाही |
|---|---|---|
| 1 | वयाचा पुरावा - जन्म प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला प्रत | |
| 2 | स्थानिक रहिवासी असल्याबाबतचा पुरावा - तहसिलदार यांचा वास्तव्याचा/रहिवासी दाखला अथवा आधारकार्ड, निवडणुक ओळखपत्र, ड्रायव्हींग लायसन्स यापैकी एक पुरावा | |
| 3 | शैक्षणिक पात्रतेचा पुरावा किमान 10 वी पास गुणपत्रक/प्रमाणपत्र त्यावरील परिक्षा पास गुणपत्रक/प्रमाणपत्र | |
| 4 | जात प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवार असल्यास) / EWS प्रमाणपत्र (लागु असल्यास) | |
| 5 | उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबत नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (लागु असल्यास) | |
| 6 | अर्जदाराचा फोटो, एक अर्जावर चिकटविणे व एक अर्जासोबत | |
| 7 | लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नमुना अ | |
| 8 | परिक्षा शुल्क भरणा केलेले पावतीची प्रत | |
| 9 | आधारकार्ड / पॅनकार्ड / ड्रायव्हींग लायसन्स / निवडणुक ओळखपत्र प्रत | |
| 10 | स्वयंघोषणापत्र | |
| 11 | उमेदवार पोलीस पाटीलांचे वारस असल्यास त्याबाबतचे संबंधित तहसिलदार यांचे पत्र | |
| 12 | उमेदवार माजी सैनिक असल्यास जिल्हा सैनिक बोर्डमध्ये नाव नोंदणी केलेबाबतचे प्रमाणपत्र | |
| 13 | विवाहीत महिला उमेदवार असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र/नाव बदलाबाबतचे गॅझेट प्रत/ पॅनकार्डची प्रत | |
| 14 | कोणत्याही कारणास्तव नावात बदल झाला असल्यास त्याबाबतचे शासन राजपत्राचीप्रत | |

दिनांक -

ठिकाण -

(उमेदवाराचे संपुर्ण नाव व सही)

31-10-23

# स्वयंघोषणापत्र

मी श्री./श्रीमती .............................................................................. श्री ........................................................................................
यांचा मुलगा/मुलगी/पत्नी असे प्रमाणित करतो / करते की, उपविभागीय दंडाधिकारी कार्यालय कणकवली यांचे यांचे आस्थापनेवरील पोलीस पाटील पद भरती 2023 ची जाहिरात/जाहीरनामा मी काळजीपुर्वक वाचला/वाचली असुन सदर जाहिरनाम्यातील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी असुन त्याचे पृष्टर्थ प्रमाणपत्रांचे साक्षांकित प्रती सोबत जोडलेल्या आहेत. वर नमुद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळुन आल्यास माझी सदर पदाकरीता उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल व मी कायदेशीर कारवाईस पात्र राहीन याची मला जाणीव आहे. याबाबत नियुक्ती अधिका-यांचा निर्णय मला बंधनकारक राहील व याबाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. तसेच मी कोणत्याही राजकीय पक्षाशी संबंधित नाही. मी ग्रामपंचायत सदस्य नाही. मी खाजगी, निमसरकारी संस्थेचा सदस्य अथवा पुर्णवेळ नोकरी करत नाही. मला कोणत्याही गुन्हयात कोणताही दंड अगर शिक्षा झालेली नाही. पोलीस पाटील पदावरील नियुक्तीकरीता लेखी परिक्षेत उत्तीर्ण झाल्यास तोंडी परिक्षेपुर्वी कागदपत्र पडताळणीदरम्यान आवश्यक असणारे याबाबतचे संबंधित पोलीस स्टेशनचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र मी सादर करणेची हमी देत आहे.

दिनांक -

ठिकाण - (उमेदवाराचे संपुर्ण नाव व सही)

31-10-23

महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र ) नियम 2005 मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना

प्रतिज्ञापत्र

नमुना - अ

( नियम 4 पहा )

मी श्री./श्रीमती.................................................................श्री.............................................................

यांचा मुलगा/मुलगी/पत्नी वय वर्ष...............रा.......................................................................याव्दारे पुढीलप्रमाणे जाहीर करतो/करते की

(1) मी पोलीस पाटील पदासाठी अर्ज दाखल केला आहे.

(2) आज रोजी मला ................ (संख्या) इतकी मुले आहेत. त्यापैकी दि. 28/03/2005 यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या .....................असुन त्यांचे जन्म दिनांक ..................................................................आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा.)

(3) हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दि. 28/03/2005 व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईन याची मला जाणीव आहे

ठिकाण - ..............................

दिनांक - ..............................

अर्जदाराचे नाव व सही

31-10-23